## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रना नांदेड

**प्रस्तावना**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड कार्यालयामार्फत विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करणेत येते. सदरचे कार्यालय हे एक स्वायत्त संस्था असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० नोंदणी क्रमांक एन.डी.डी. १/१९७५, दिनांक ३०.०१.१९७५ अन्वये हे कार्यालय मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयामार्फत राबविणेत येणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व ईतर राज्य पुरस्कृत आवास योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण इत्यादी महत्वाकांक्षी योजनांचा समावेश होतो. जिल्हयामध्ये असणाऱ्या पात्र लाभार्थी कुटुंबांकरीता कल्याणकारी योजना राबविण्याचे कार्य या कार्यालयामार्फत करणेत येते. ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय कटिबद्ध आहे.

| अ.क्र | योजना | अनुदान | योजनेची माहीती |
|---|---|---|---|
| १ | रमाई आवास योजना | **रु.120000/-** | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान , शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>रमाई आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| २ | शबरी आवास योजना | **रु.120000/-** | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>शबरी आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील अनुसुचित जमाती प्रवर्गातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण ) | **रु.120000/-** | सन २०१६-१७ पासून सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या माहितीवरून या योजनेसाठी आवास सॉफट प्रणालीमध्ये Generated Priority List नुसार बेघर / २ खोल्या पर्यत कच्चे घरात वास्तव्य करणारे लाभार्थी यांची दि. १५ ऑगस्ट २०१६ व त्या दरम्यान होणा-या ग्रामसभेमध्ये मान्यता घेवून प्राधान्य क्रम यादी तयार करणेत आली. त्या प्राधान्य क्रम यादीची तालुकास्तरीय समिती व जिल्हास्तरीय समिती कडून मान्यता घेवून अंतिम यादी तयार करणेत आली. प्राधान्य क्रमानुसार लाभ देण्यात येतो. आवास प्लस प्रपत्र ड मध्ये पात्र झालेल्या लाभार्थ्यांना सन २०२१ — २२ प्राधान्य क्रमानुसार लाभ देण्यात येतो.<br>प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>प्रधानमंत्री आवास योजना केंद्र पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ४ | मोदी आवास योजना | **रु.120000/-** | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>मोदी आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील इतर मागास वर्ग (ओ.बी.सी / एस.बी.सी. / एन.टी) प्रवर्गातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ५ | पारधी आवास योजना | **रु.120000/-** | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>पारधी आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील पारधी समाजातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ६ | आदीम कोलाम आवास योजना | **रु.120000/-** | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>आदीम कोलाम आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील आदीम कोलाम समाजातील बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ७ | अटल बांधकाम कामागार आवास योजना | **रु.**120000/- | प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. १,२०,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.२६०००/-<br>अटल बांधकाम कामगार आवास योजना राज्य शासन पुरस्कृत योजना असून ग्रामीण भागातील नोंदणीकृत बांधकाम कामगारासाठी बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ८ | पीएम जनमन योजना | **रु.** 200000/- | पीएम जनमन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असुन आदिम कोलाम समाजासाठी असुन प्रति लाभार्थी देय रक्कमेची मर्यादा:- प्रति लाभार्थी रु. २,००,०००/- शासन अनुदान व शौचालय बांधकामासाठी रु.१२०००/- व मनरेगा अंतर्गत रु.४००००/-<br>बेघर व कच्चे घर असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. सदर लाभार्थीचे नाव ग्रामसभेने मंजूर केलेल्या कायम प्रतिक्षा यादीत असणे आवश्यक आहे. कमीत कमी २६९ चौ.फु.चे बांधकाम करणे आवश्यक आहे. |
| ९ | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | **रु.**120000/- | विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आहे. |
| १० | पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय योजना | **रु.** 100000/- | पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय ही योजना केंद्र पुरस्कृत व ईतर राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत घरकुल मंजुर झालेल्या लाभार्थ्यांना स्वत: ची जागा नाही अश्या लाभार्थ्यांसाठी असुन ५०० स्के.फुट जागा खरेदीसाठी शासकीय मुल्यांकन किंवा कमाल रुपये १०००००/- पर्यंत अनुदान दिले जाते. |
| ११ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | | ग्रामीण भागातील गरीब व दारिद्रय रेषेखालील महिलांना एकत्र आणून त्यांचे स्वयं सहाय्यता समूह स्थापन करून त्यांच्या सक्षम संस्था उभारणे. स्वयं सहाय्यता समूहांची वरिष्ठ संस्था म्हणून गावस्तरावर ३० स्वयं सहाय्यता समुहासाठी एक ग्रामसंघ तयार केला जातो तसेच प्रभागस्तरावर वरिष्ठ संस्था म्हणून प्रभागसंघाची स्थापना करण्यात येते. या संस्थामार्फत गरिबांना वित्तीय सेवा पुरविणे गरिबांची व त्यांच्या संस्थांची क्षमता वृद्धी व कौशल्यवृधी करणे आणि शाश्वत उपजीविकेची साधणे उपलब्ध करून देऊन त्यांना दारिद्रयाच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे. गरीब व जोखीमप्रवण कुंटूंबाचा अभियानात समावेश करणे, वित्तीय सेवा व शासकीय लाभ मिळवून देणे, सामाजिक सुरक्षा निर्माण करणे, गरीबांच्या आयुष्यात समृध्दी निर्माण करण, ग्रामीण भागामध्ये बँकेची भूमिका सक्रीय करणे , आर्थिक साक्षरता व शिक्षण प्रदान करणे,बँकेच्या सेवाकरिताचा जास्तीचा खर्च व वेळ कमी करणे शाश्वत उपजीविका प्रदान करणे, स्वयं सहाय्यता समूहातील |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना जोखीम व्याप्ती प्राप्त व्हावी याकरिता त्यांना सामाजिक सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्यात, ग्रामीण भागातील अभियानात सहभाग़ी महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम करणे, अभियानाच्या कृतीसंगम(Convergence) विभागामार्फत महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण कुटूंबांच्या समृद्धीसाठी अभियानात विवीध उपक्रम राबविले जातात.<br><br>ग्रामीण महिलांचे आरोग्य, पोषण व स्वच्छता, शिक्षण , पंचायतराज संस्थामधील सहभाग, शासनाच्या विविध योजनांमधील सहभाग तसेच त्यांच्या कुटूंबांमध्ये उपजिवीकेचे शाश्वत स्त्रोत विकसीत करण्यासाठी इतर विभागासोबत कृतीसंगम करुन शाश्वत उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अभियानाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून त्याकरीता शासनाच्या विवीध योजनांचा लाभ महिलांना मिळवून देण्यावर भर देण्यात येतो, कृतीसंगम विभागामार्फत ग्रामीण महिलांना ईतर शासकीय विभाग जसे कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, समाज कल्याण विभाग, मानव विकास मिशन, आवास योजना, आरोग्य विभाग, महिला बाल विकास विभाग इत्यादी शासकीय विभागातील योजनेचा लाभ महिलांना मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. कृतीसंगम विभागातंर्गत प्रामुख्याने विविध योजनेची अंमलबजावणी करण्यात येते हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. |